**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२५६**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १० जानेवारी, २०१८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या २५६व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

(स्वाक्षरी) १०/१/१८
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५६वी बैठक

**दिनांक :** **२० डिसेंबर, २०१७ (बुधवार)**

**वेळ :** **सायं. ६.०० वाजता**

**स्थळ :** **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**हैद्राबाद हाऊस, सिव्हिल लाईन्स, जी.पी.ओ. समोर**
**नागपूर – ४४० ००१**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. सुमीत मल्लिक<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर चोरे<br>उप-आयुक्त (सुधार),<br>(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी),<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. भा. गाडगे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या २५५व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या २५५व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील जमिनीवर भव्य स्मारक उभारणे या कामाच्या फेरनिविदेनंतरच्या प्राप्त झालेल्या मे.शापूरजी पालनजी आणि कं. प्रा. लि. यांच्या देकारास मंजूरी देणेबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी प्रकल्पाची माहिती व वैशिष्ट्ये विषद केली. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, स्मारकाच्या कामाच्या प्रथम वेळी निविदेची किंमत रू.५९१ कोटी होती तथापि पुतळा व मुख्य इमारतीचे आयुष्य १०० वर्षे असल्याने आय.आय.टी. च्या तज्ञ प्राध्यापकाचा तांत्रिक सल्ला घेतला गेला. त्यानुसार लोह व स्टीलच्या वापर यामुळे प्रकल्पाची किंमत रु.६२२.४० कोटी एवढी झाली.

..३/-

३.२ महानगर आयुक्तांनी कंत्राटदाराच्या नेमणुकीसाठीच्या निविदा प्रक्रियेची माहिती देताना असेही सांगितले कि, सदर कामासाठी प्रथम निविदे दरम्यान मे. शापूरजी पालनजी आणि कं. प्रा. लि. या एकमेव कंत्राटदाराची निविदा प्राप्त झाली. तथापि, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार प्रथम वेळी एक निविदाच नियमानुसार स्विकारणे शक्य नसल्याने प्राधिकरणामार्फत फेरनिविदा मागविण्यात आल्या. महानगर आयुक्तांनी पुढे असे सांगितले की, फेर निविदेमध्ये निविदा प्रक्रियेअंती मे. शापूरजी पालनजी आणि कं. प्रा. लि. यांची एकमेव निविदा प्राप्त झाली. निविदादाराने देकारासोबत सादर केलेल्या सर्व तांत्रिक बाबींची तपासणी मे. शशी प्रभु असोशिएटस् व डिझाईन असोशिएटस् आय.एन.सी. या सल्लागाराकडून करण्यात आली. प्राधिकरणातील निविदा मूल्यांकन समितीने निविदाकाराची आर्थिक देकार उघडण्याची शिफारस केली.

३.३ निविदाकाराच्या आर्थिक देकारानुसार निविदाकार मे. शापूरजी पालनजी आणि कं. प्रा. लि. यांचा रु.७८६.०४ कोटी एवढा देकार प्राप्त झाला. त्यानुसार निविदा दर व निविदेतील अधिक्याची विस्तृत कारणमीमांसा देण्यासाठी तसेच निविदा दर कमी करण्याबाबत मे. शापूरजी पालनजी आणि कं. प्रा. लि. यांना विनंती करण्यात आली. त्यानुसार त्यांनी अंतिमत: रू.७०९ कोटी एवढा देकार (१२% जी.एस.टी.सह) म्हणजेच (१३.९१% अधिक) कळविला.

३.४ महानगर आयुक्त यांनी सल्लागार मे. शशी प्रभु असोशिएटस् व डिझाईन असोशिएटस् इन्कुल्सिव्ह यांनी मे. शापूरजी पालनजी आणि कं. प्रा. लि. यांचा देकार स्विकृत करण्याबाबत शिफारस केली.

**<u>निर्णय</u> :** **<u>चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला</u> :-**

**<u>ठराव क्र. १३३९ :-</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून

कार्यकारी समिती भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदूमिल येथील जमिनीवर भव्य स्मारक उभारणे या कामाच्या फेरनिविदेनंतरच्या प्राप्त झालेल्या मे. शापूरजी पालनजी आणि कं. प्रा. लि. यांच्या वाटाघाटीनंतर प्राप्त झालेल्या रु.७०९ कोटी (१३.९१% अधिक्य) देकार मंजूर करण्याचे व त्या अनुषंगाने पुढील कामाचे आदेश देण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी व हे काम वेळेत पूर्ण करण्यासंबंधीची आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मेट्रो मार्ग-२ब मार्गिकेसाठी [डी. एन. नगर – मंडाळे] डेपो, स्टेशन, स्टाफ क्वार्टर, ओसीसी, ऑक्सिलरी स्ट्रक्चर्ससाठी ई आणि एम वर्क्स, सिव्हिल वर्क्स यांच्यासह आर्किटेक्चरल आणि बिल्डींग सर्व्हिसेससाठी सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (डीडीसी) ची नियुक्ती करणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई शहरात पुढील ३ ते ४ वर्षात ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली असून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे रु. ३५,४०० कोटीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यापैकी मेट्रो मार्ग २ब साठी अंदाजीत केलेल्या ₹ १०९८६ कोटी प्रकल्प किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाच्या दिनांक २१ मार्च, २०१६ रोजीच्या १३९व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली असून दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रकल्पास मान्यता मिळाली आहे.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, DMRC यांनी दिल्ली व अन्य शहरांतील मेट्रो प्रकल्पांच्या धर्तीवर मेट्रो मार्ग २ब करीता सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) नेमणूकीसाठी अंदाजपत्रक व मसुदा निविदा सादर केली होती. सल्लागारांकडून प्रामुख्याने खालील सेवा अपेक्षित आहेत :-

१. स्थानकांच्या इमारतीचे वास्तुकला योजना (Architectural Scheme)

२. विद्युत व यांत्रिकी सेवांचे (E & M) संकल्पचित्र बनविणे.

३. डेपोतील इमारतींचे विस्तृत संकल्पचित्र बनविणे.

४.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मेट्रो मार्ग – २ब (डी .एन .नगर - मंडाले) या मेट्रो मार्गाच्या स्थापत्य, वास्तु आणि इमारत सेवा, विद्युत व यांत्रिकी कामासाठी सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) ची नियुक्ती करणेकरिता ई-निविदा मागविण्यासाठी 'लोकमत' व 'डी.एन.ए.' या वृत्तपत्रात दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. प्रचलित पद्धतीनुसार निविदा पुर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले. दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी ५ ई-निविदा प्रस्ताव प्राप्त झाल्या आणि दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी दुपारी ११.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. |
| २ | Consortium M/s 3 TI Progetti Italia- Ingegneria Indtegrata SPA & M/s. TATA Consulting Engineers Limited. |
| ३ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura, SAU, (AYESA) |
| ४ | JV of M/s. Veritas Architects SDN. BHD. & M/s. Archohm consults Pvt. Ltd. |
| ५ | Consortium M/s. EPTISA Services de Ingenieria, S.L. & M/s. PADECO Co Ltd. and PADECO India Pvt. Ltd. |

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राप्त झालेल्या ई-निविदांची पात्रता व तांत्रिक छाननी मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेमार्फत करण्यात आली. या अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | पात्र /अपात्र |
|---|---|---|
| १ | M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. | **पात्र** |
| २ | Consortium M/s. ३ TI Progetti Italia- Ingegneria Indtegrata SPA & M/s. TATA Consulting Engineers Limited. | **पात्र** |
| ३ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura, SAU, (AYESA) | **पात्र** |
| ४ | JV of M/s. Veritas Architects SDN. BHD. & M/s. Archohm consults Pvt. Ltd. | **अपात्र** |
| ५ | Consortium M/s. EPTISA Services de Ingenieria, S.L. & M/s. PADECO Co Ltd. and PADECO India Pvt. Ltd. | **अपात्र** |
| | **एकूण** | **०३/०५** |

तांत्रिक छाननी अहवालानुसार वरील अनु क्र. ४ मध्ये नमूद केलेले निविदाकार मे. JV of M/s.Veritas Architects SDN. BHD. & M/s. Archohm consults Pvt. Ltd. निविदा अटी व शर्तीनुसार किमान आवश्यक पात्रता निकष पूर्ण करत नसल्यामुळे त्यांनी सादर केलेली निविदा अपात्र ठरविण्यात आली आहे. तसेच अनु क्र. ५ मध्ये नमूद केलेले निविदाकार Consortium M/s. EPTISA Services de Ingenieria, S.L. & M/s. PADECO Co Ltd. and PADECO India Pvt. Ltd निविदा अटी व शर्ती मध्ये नमूद केलेली आर्थिक पात्रता निकष पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांनी सादर केलेली निविदा अपात्र ठरविण्यात आली आहे.

तसेच, तिन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व आर्थिक प्रस्तावांची छाननी मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेमार्फत करण्यात आली. प्राप्त वित्तीय प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी विदेशी चलनात प्राप्त झालेल्या वित्तीय प्रस्तावांचे भारतीय रुपयांत रुपांतर करण्यात आले आहे. त्यासाठी अंतिम निविदा सादर करण्याच्या

तारखेच्या २८ दिवस आधीच्या म्हणजेच दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजीचे विनिमय दर (१€ = ₹ ७८.१६) घेऊन निविदाकाराने दिलेल्या आर्थिक प्रस्तावांचा रुपयांत गोषवारा खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | निविदाकाराने दिलेली किंमत (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. | १३.१५ कोटी | ७.७४ |
| २ | M/s. AYESA Ingenieria y Arquitectura, SAU, (AYESA) | | ९.५० |
| ३ | Consortium M/s. ३ TI Progetti Italia- Ingegneria Indtegrata SPA & M/s. TATA Consulting Engineers Limited. | | १०.३१ |

४.५ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. यांच्या रु. ७.७४ कोटी (अंदाज पत्रकातील किंमतीपेक्षा ४१.१४% कमी) + GST किंमतीचा देकार लघुत्तम आहे. सदर देकार अंदाजपत्रकिय किंमतीपेक्षा ४१.१४% कमी असल्याने या संदर्भात प्राधिकरणाने M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. कडून निविदेमधील कामाची व्याप्ती समजली आहे व त्यानुसार त्यांनी आर्थिक प्रस्ताव सादर केला आहे, याबाबत हमीपत्र मागितले. त्यास अनुसरून M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. यांनी सदर कामाची व्याप्ती समजली असून त्याप्रमाणेच प्रस्ताव सादर केल्याचे कळविले आहे.

४.६ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०१७ या आदेशान्वये निविदा शिफारस समिती गठीत केली असून, त्यामध्ये संचालक (प्रकल्प) -मेट्रो यांचा अध्यक्ष, १) मुख्य लेखा अधिकारी २) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग ३) मुख्य अभियंता, (नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र) बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा यांचा अहवाल निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी सादर करण्यात आला. निविदा

..८/-

शिफारस समितीने मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा यांच्या अहवालास दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली असून निविदा स्विकारण्याची शिफारस केली आहे.

४.७ वरील प्रस्तावावर चर्चा करताना, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. या कंपनीने अंदाज पत्रकातील किंमतीपेक्षा ४१.१४ % कमी + GST असा आर्थिक प्रस्ताव सादर केला असून, त्यानुसार M/s SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. यांच्या कामाचा दर्जा व कंपनीची प्रतिष्ठा या विषयी विचारणा केली. यावर खुलासा करताना अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी संगितले की, M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. यांनी यापूर्वी भारतात DMRC व लखनऊ मेट्रो प्रकल्पामध्ये कामे केली आहेत व त्यांचा मेट्रो क्षेत्रातील कामाचा दर्जा समाधानकारक आहे.

४.८ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. मेट्रो मार्ग-२ब च्या प्रकल्पासाठी काम करू शकेल का, अशी विचारणा केली, यावर खुलासा करताना अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. यांचा मेट्रो मार्ग-४ च्या प्रकल्पासाठी अंदाज पत्रकातील किंमतीपेक्षा ४२.२३ % कमी असा आर्थिक प्रस्ताव स्विकारण्यास कार्यकारी समितीने यापूर्वीच्या बैठकीत मान्यता दिली असुन त्यांना निविदा स्विकृती पत्र प्राधिकरणाकडून देण्यात आले आहे.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३४० :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे M/s. SYSTRA MVA consulting (India) Pvt. Ltd. यांचा

रु. ७.७४ कोटी सर्व करांसहीत (जीएसटी वगळून) किंमतीचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) म्हणून नियुक्ती करण्यास तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मेट्रो मार्ग-२ब डि. एन. नगर – मंडाळे या मेट्रो मार्गाकरीता मंडाळे, मानखुर्द येथे डेपोच्या बांधकामाकरीता पॅकेज क्र.१४ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत तसेच दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग २ब डि. एन. नगर- मंडाळे या उन्नत मेट्रो मार्गाची उभारणी करणे या प्रकल्पासाठी रु. १०,९८६ कोटी किंमतीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग २ब, मेट्रो मार्ग ७ व मेट्रो मार्ग २अ मध्ये गाड्यांची अदलाबदली (interoperability) होणार असून पूर्णत: एकच मार्ग होऊ शकेल. उपरोक्त मेट्रो मार्ग क्र. ७ साठी दहिसर येथे, मेट्रो मार्ग २अ साठी चारकोप-मालवणी येथे व मेट्रो मार्ग २ब साठी मंडाळे येथे, ह्या तिन्ही ठिकाणी स्वतंत्र मेट्रो डेपोचे बांधकाम करण्याचा समावेश संबंधीत सविस्तर प्रकल्प अहवालात करण्यात आला आहे. परंतु उपरोक्त तिन्ही मार्गांचा पूर्णत: एकच मार्ग होणे अपेक्षित असल्याने, प्रस्तावित दहिसर व चारकोप-मालवणी व मंडाळे येथे तीन स्वतंत्र मेट्रो डेपो बांधणे जास्त खर्चिक व गैरसोयीचे होईल असे यासंदर्भात मे.दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (DMRC) प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले. याबाबत झालेल्या चर्चेत वरील मेट्रो मार्ग ७ साठी दहिसर येथे व मेट्रो मार्ग २अ साठी चारकोप येथे किमान सोयी

सुविधांसह सॅटेलाईट डेपो व मेट्रो मार्ग २ब वरील मंडाळे येथे तिन्ही मेट्रो मार्गांसाठी आवश्यक सर्व सोयी सुविधांसह मुख्य डेपोचे बांधकाम करण्याचे ठरविण्यात आले. मेट्रो मार्ग २ब च्या प्रकल्प अहवालाप्रमाणे प्रशासकीय मान्यतेत १८ स्टेबलिंग लाईन्स च्या डेपो बांधकामासाठी रु.८० कोटी (रु. ९७.८४ कोटी करांसहीत) इतकी तरतूद करण्यात आली आहे. परंतु प्रकल्प अहवाल तयार करताना DMRC यांनी डेपोसाठीच्या सदर तरतुदीत साईट स्पेसिफिक बाबींचा समावेश करण्यात आलेला नव्हता. DMRC यांनी प्रकल्प अहवालात डेपो बांधकामासाठी गृहीत धरलेली रक्कम सर्वसाधारण डेपो (ब्लॉक एस्टिमेट) प्रमाणे आहे. सबब प्रकल्प सल्लागाराने तयार केलेल्या अंदाजपत्रकात साईट स्पेसिफिक बाबी उदा. साईटची जागा दलदलीची असल्याने मोठ्या प्रमाणावर आवश्यक सॉइल रिप्लेसमेंट, जमिनीची सुधारणा, पाईल फॉऊंडेशनची आवश्कता, सुमारे दुप्पट झालेले डेपोचे क्षेत्रफळ, मेट्रो डेपोच्या क्षमतेत सुमारे चारपट झालेली वाढ (१८ स्टेबलिंग लाईन ऐवजी ७२) व प्रत्येक सोयी सुविधेत त्याप्रमाणात झालेली वाढ या बाबींचा समावेश अंदाजपत्रकात केल्याने मेट्रो डेपोच्या अंदाजित किंमतीत रु.९७.८४ कोटी वरुन रु. ४६५ कोटी इतकी वाढ होत आहे. मेट्रो मार्ग २ब प्रकल्प नियोजित वेळापत्रकाप्रमाणे कार्यान्वीत करण्यासाठी मेट्रो डेपोच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया सुरु करणे आवश्यक असल्याने मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१७ रोजी मेट्रो मार्ग २ब च्या (मेट्रो मार्ग क्र. ७ व मेट्रो मार्ग क्र. २अ साठीच्या एकत्रित गरजा लक्षात घेऊन) डेपोसाठी रु.९७.८४ कोटी तरतूदी ऐवजी वाढीव रु.४६५ कोटीच्या बांधकाम किंमतीस मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने सदर वाढीव किंमतीस प्राधिकरणाची मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

५.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मेट्रो मार्ग २ब च्या मंडाळे येथील डेपोच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र. १४ च्या ई-निविदा मागविण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये दिनांक ०९ सप्टेंबर, २०१७ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष निविदेचा लिफाफा 'अ' व 'ब' उघडण्यात आला. या निविदा प्रक्रियेत एकूण आठ निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या. सदर पात्र ई-निविदांच्या पात्रता व

तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे सल्लागार M/s. AICA Consortium मार्फत करण्यात येऊन त्याचा अहवाल त्यांनी प्राधिकरणास दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार तांत्रिकदृष्ट्या पात्र सर्व आठ निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी उघडण्यात आले. या उघडलेल्या वित्तीय लिफाफ्यांची छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार M/s.AICA Consortium मार्फत करण्यात आली. M/s. AICA Consortium दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी सादर केलेल्या निविदा छाननी अहवालानुसार निविदाकारांच्या देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटीत) | प्राप्त रक्कम (रु.) | % कमी /अधिक |
|---|---|---|---|---|
| १ | मे. सॅम बिल्टवेल लि. - अल फरमा इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. (जे.व्ही.) | ४१५.०२ | ४९९,४०,०७,९३२ | +२०.३३% |
| २ | मे. जे. एम.सी. प्रोजेक्टस इंडिया लि. | | ४४२,००,५७,३६१ | +६.५०% |
| ३ | मे. रेलकॉन इंफ्राप्रोजेक्टस - मे. अश्विनी इंफ्राडेव्हलपमेंट्स लि. (जे.व्ही.) | | ४३०,३४,३४,२५० | +३.६९% |
| ४ | मे. अहलुवालिया कॉंट्रॅक्टस लि. | | ४३०,१३,५९,१०७ | +३.६४% |
| ५ | मे. सिंप्लेक्स इंफ्रा. | | ५८५,००,५७,३६१ | +४०.९६% |
| ६ | मे. एन सी सी लि. | | ४९३,८६,३६,०५३ | +१८.९९% |
| ७ | मे. एम बी झेड, युक्रेन - मे. आर सी सी इन्फ्रा लि. (जे.व्ही.) | | ३९०,४३,६८,३२७ | -५.९३% |
| ८ | मे. रिलायंस इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. | | ४५०,००,०२,२९२ | +८.४३% |

५.४ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, आर्थिक छाननी अहवालात सल्लागाराने असे नमूद केले आहे की, पॅकेज-१४ मध्ये मे. एमबीझेड, युक्रेन - मे. आरसीसी इन्फ्रा लि. (जे.व्ही.) यांचा देकार हा लघुत्तम असून अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (४१५.०२ कोटी) ५.९३ % कमी (रु.३९०.४३ कोटी ) आहे व मे. एमबीझेड, युक्रेन - मे. आरसीसी इन्फ्रा लि. (जे.व्ही.) यांचा अंदाजित दरांपेक्षा कमी देकार सादर करण्यामागे कमी जोखीम असलेले बाबनिहाय निविदा (Item rate tender) हे असू शकते असे नमूद केले. तसेच M/s. AICA Consortium यांनी असे

सुचविले की, MMRDA निविदाकाराकडून त्यांनी सादर केलेल्या देकार विषयी स्पष्टीकरण मागू शकते. त्याअनुषंगाने मे. एमबीझेड, युक्रेन - मे. आरसीसी इन्फ्रा लि. (जे.व्ही.) यांनी स्पष्टीकरण सादर केले आहे.

५.५ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने अतिरिक्त महानगर आयुक्त तथा प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये (१) प्रकल्प संचालक -मेट्रो (२) वित्तीय सल्लागार (३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग (४) मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा समावेश आहे. मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे सल्लागार M/s. AICA Consortium यांचा तांत्रिक व आर्थिक छाननी अहवाल सदर निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्या अनुषंगाने निविदा शिफारस समितीने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे सल्लागार M/s. AICA Consortium यांनी सादर केलेला अहवाल विचारात घेऊन लघुत्तम देकार सादर केलेल्या मे.एमबीझेड, युक्रेन-मे.आरसीसी इन्फ्रा लि.(जे.व्ही.) यांची निविदा स्विकारण्यास शिफारस केली आहे. मे. एमबीझेड, युक्रेन - मे. आरसीसी इन्फ्रा लि. (जे.व्ही.) यांनी सादर केलेला देकार हा अंदाजित किमतीपेक्षा फक्त ५.९३ % कमी दराचा असल्याने त्यांनी सादर केलेला देकार हा रास्त व स्वीकारार्ह आहे.

५.६ वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मे.एमबीझेड, युक्रेन – मे. आरसीसी इन्फ्रा लि. (जे. व्ही.) यांच्याकडे मेट्रो डेपो बांधकामाचा अनुभव आहे का अशी विचारणा केली. यावर अति. महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की कोणताही निविदाकार मेट्रो बांधकामासाठीच्या निविदा अटी व शर्तीत अंतर्भूत करण्यात आलेल्या अनुभवाच्या तांत्रिक निकषांची पुर्तता करत असेल तरच निविदाकाराचा वित्तीय लिफाफा उघडण्यात येतो. सदर कंपनी मे. एमबीझेड, युक्रेन – मे. आरसीसी इन्फ्रा लि. (जे. व्ही.) यांनी सदर तांत्रिक पात्रता निकषांची पूर्तता केली आहे.

५.७ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मे. एमबीझेड, युक्रेन – मे.आरसीसी इन्फ्रा लि. (जे. व्ही.) मधील मे. एमबीझेड ह्या कंपनीच्या युक्रेन येथील कामाची खातरजमा करण्यात आली आहे का किंवा कसे अशी विचारणा केली. त्यावर अति. महानगर आयुक्त यांनी

कार्यकारी समितीच्या असे निदर्शनास आणले की, सदर कंपनीने सादर केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र भारतीय दुतावासाने साक्षांकित केले आहे. तसेच सदर कंपनी ही सर्व आर्थिक व तांत्रिक पात्रता निकषांची पुर्तता करीत आहे.

**निर्णय :** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १३४१ :-

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याव्दारे मेट्रो मार्ग २ब साठीच्या मंडाले येथील डेपो बांधकामासाठी मे.एमबीझेड, ,युक्रेन - मे. आरसीसी इन्फ्रा लि. (जे.व्ही.) यांचा रु.३९०.४४ कोटी रक्कमेचा लघुत्तम देकार (अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ५.९३ % कमी दराचा) स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्याता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ :** **मेट्रो मार्ग-२ब डि. एन. नगर – मंडाळे या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.०४R अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो बृहत आराखडयामधील ११८ कि.मी. मार्गांची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकरणाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या १३८ व्या बैठकीत व राज्य शासनाने ऑक्टोबर, २०१५ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर बृहत आराखड्यामधील मेट्रो मार्ग २ ब डि. एन. नगर - मंडाळे

प्रकल्पाकरीता एकूण रू. १०,९८६ कोटी किंमतीस व या प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. तसेच DMRC यांच्या अंतरिम सल्लागार म्हणून नेमणूकीस कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या २४६ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या मेट्रो मार्ग २ब प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून M/s. AICA Consortium ह्यांची दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१६ रोजी नेमणूक करण्यात आली आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग क्र. ४ व २ब च्या एकूण नऊ पॅकेजसाठी (सी. ए. ०४ ते सी. ए.१२) च्या स्थापत्य बांधकामाकरीता ई-निविदा जानेवारी, २०१७ मध्ये मागविण्यात आल्या होत्या. सदर प्रक्रियेतील पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) उघडण्यात आल्यावर सर्व पॅकेजसाठी अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा सुमारे २४ ते २५ % अधिक देकार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले. या मेट्रो स्थापत्य कामांसाठी देकार जास्त दराचे असल्याने प्राधिकरणाने फेर निविदा मागविण्याचा निर्णय घेतला. त्याअनुषंगाने प्रथम मेट्रो मार्ग क्र. ४ व २ब च्या नऊ पॅकेजपैकी मेट्रो मार्ग २ब च्या पॅकेज सी. ए. ०४ व सी. ए. ०५ ह्या दोन पॅकेजमधील कामाची व्याप्ती एकत्र करुन संयुक्त पॅकेज सी. ए. ०४R, या पॅकेजसाठी फेरनिविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने मेट्रो मार्ग २ब च्या पॅकेज क्र.सी.ए. ४Rच्या स्थापत्य बांधकामाकरीता ई-निविदा वृत्तपत्रामध्ये दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधींसमक्ष निविदेचा लिफाफा 'अ' व 'ब' उघडण्यात आला. या निविदा प्रक्रियेत एकुण आठ निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या. सदर पात्र ई-निविदांची पात्रता व तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे सल्लागार M/s. AICA Consortium मार्फत करण्यात येऊन त्याचा अहवाल त्यांनी प्राधिकरणास दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार तांत्रिकदृष्टया पात्र सर्व आठ निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७ रोजी उघडण्यात आले. या उघडलेल्या वित्तीय लिफाफ्यांची छाननी मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार

..१५/-

M/s.AICA Consortium यांचे मार्फत करण्यात आली. M/s. AICA Consortium यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी सादर केलेल्या निविदा छाननी अहवालानुसार निविदाकारांच्या देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे:-

| अ.क्र | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटीत) | प्राप्त रक्कम (रु. कोटीत) | % कमी /अधिक |
|---|---|---|---|---|
| १ | मे. ॲफकॉन इंफ्रास्ट्रक्चर | ९९८.०५ | १२३५.०० | +२३.७४ |
| २ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | ११५७.३२ | +१५.९६ |
| ३ | मे. जे. एम.सी. प्रोजेक्टस इंडिया लि. | | १२२२.७८ | +२२.५२ |
| ४ | मे. एल ॲण्ड टी | | ११७१.०० | +१७.३३ |
| ५ | मे. सिंप्लेक्स इंफ्रा. | | १०८०.०० | +८.२१ |
| ६ | मे.आय.एल. ॲड एफ.एस. – ई.सी.सी.एल. (जे.व्ही.) | | १२१३.८७ | +२१.६३ |
| ७ | मे. एस.ई.एल.-एस.पी.एस.सी.पी.एल. (जे.व्ही.) | | १११७.७८ | +१२.०० |
| ८ | मे. सी.एच.ई.सी.एल. टी.पी.एल.-जे.व्ही. | | ११६६.१५ | +१६.८४ |

६.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पॅकेज-०४R च्या कामासाठी मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांच्या रु.१,०८० कोटी रक्कमेचा अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ८.२१% जास्त रक्कमेचा देकार लघुत्तम आहे व या कंत्राटदाराची निविदा निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारी व रास्त आहे असा अहवाल सल्लागार M/s. AICA Consortium यांचेकडून प्राप्त झाला आहे. सदर अहवाल कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. प्राधिकरणाच्या असे निर्दशनास आले की मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांनी अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा जास्त देकार दिला आहे. याबाबत प्राधिकरणाने मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांच्याकडे अधिक दराच्या देकाराविषयी स्पष्टीकरणासह व सादर केलेल्या देकारासंबधाने वाटाघाटी करण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी प्राधिकरणाच्या कार्यालयात बोलवण्यात आले. मे.सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांनी अधिक दराच्या देकारासंबंधात असे नमुद केले की, त्यांनी सादर केलेला देकार हा करावयाच्या कामाच्या सर्व बाबींचा विचार करून व तुलनात्मक रित्या योग्य आहे. सबब सादर केलेला देकार कमी करणे शक्य नाही. या प्रमाणे मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांनी सादर केलेल्या उत्तराची प्रत सल्लागार M/s. AICA Consortium यांना छाननीसाठी पाठविली

..१६/-

असता त्यांनी मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांनी सादर केलेला देकार हा रास्त व स्वीकारार्ह आहे, असा अहवाल सादर केला आहे.

६.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणाने अतिरिक्त महानगर आयुक्त तथा प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये (१) प्रकल्प संचालक -मेट्रो (२) वित्तीय सल्लागार (३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग (४) मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा समावेश आहे. सदर निविदा शिफारस समितीस प्रकल्पाचे सल्लागार M/s. AICA Consortium यांचा तांत्रिक व आर्थिक छाननी अहवाल मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्या अनुषंगाने निविदा शिफारस समितीने दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे सल्लागार M/s. AICA Consortium यांनी सादर केलेला अहवाल विचारात घेऊन लघुत्तम देकार सादर केलेल्या मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांची निविदा स्विकारण्यास शिफारस केली आहे.

६.५ वरील प्रस्तावावर चर्चा करतांना कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी मे. सिम्प्लेक्स इंफ्रा. लि. यांच्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही चालु आहे का अथवा त्यांना कामाची निविदा देण्यास कुठल्याही शासकीय संस्थेने बंदी घातली आहे का, अशी विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाकडे याबाबतीत कोणत्याही सुचना प्राप्त नाहीत असे स्पष्ट केले. तसेच महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी यांनी मे. सिम्प्लेक्स इंफ्रा. लि. यांच्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही असे सांगितले.

६.६ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मेट्रो मार्ग २ब च्या पॅकेज सी. ए. ०४ व सी. ए. ०५ ह्या दोन पॅकेजची व्याप्ती एकत्र केली असता पॅकेज सी. ए.०४ R प्रकल्पासाठी प्राप्त झालेला लघुत्तम देकार हा अंदाजित प्रकल्प किंमतीपेक्षा ८.२१% जास्त आहे. तथापी सी. ए. ०४ ला अंदाजित प्रकल्प किंमतीपेक्षा २४.९४ % जास्तचा लघुत्तम देकार प्राप्त झाला होता व सी. ए.०५ ला अंदाजित प्रकल्प किंमतीपेक्षा २३.३६% जास्तचा लघुत्तम देकार प्राप्त झाला होता. या तर्काप्रमाणे दोन ऐवजी तीन पॅकेजची व्याप्ती एकत्र केल्यास मिळणारा देकार हा ८.२१% पेक्षाही कमी दराचा मिळण्याची शक्यता आहे का अशी विचारणा

केली. त्यावर उत्तर देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की एकाच निविदाकाराला १६ ते २० कि.मी. एवढ्या मेट्रो लांबीचे काम दिल्यास एकाच निविदाकाराकडे पुरेशी संसाधने, मजुर व सामग्री उपलब्ध होणे शक्य नसल्याने कामाच्या पूर्ततेमध्ये विलंब होईल असे स्पष्ट केले.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला</u> :-**

**<u>ठराव क्र. १३४२ :-</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याव्दारे पॅकेज-०४R साठी मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ( ९९८.०५ कोटीच्या) ८.२१ % जास्त, रु.१,०८० कोटी रक्कमेच्या लघुत्तम देकाराची ई-निविदा स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.७ :</u>** **<u>मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता संचालक (प्रणाली) व संचालक (प्रकल्प/कामे) या पदावरील नेमणूकीबाबत.</u>**

७.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता निर्माण करण्यात आलेल्या विविध पदांपैकी संचालक (प्रणाली) व संचालक (प्रकल्प/कामे) ही पदे भरण्याच्या दृष्टीने कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४व्या बैठकीतील ठराव क्र.१३३३ अन्वये सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमास व प्राप्त अर्जदारांच्या मुलाखती घेण्याच्या दृष्टीने निवड समितीस मान्यता देण्यात आली. सदर संचालक (प्रणाली) व संचालक (प्रकल्प/कामे) या पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार सदर पदे पदोन्नतीने किंवा सरळसेवेने किंवा प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतुद आहे.

७.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपरोक्त नमूद पदांकरिता उमेदवाराकडे रु.३७,४००-६७,००० + ग्रेड वेतन रु.८,९००/- या वेतनश्रेणीतील किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. सदर तरतुदीनुसार प्राधिकरणामध्ये सद्य:स्थितीत रु.८,९००/- या ग्रेड वेतनामधील ३ वर्षाचा संबंधीत क्षेत्रातील अनुभव असलेले अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे संचालक (प्रणाली) व संचालक (प्रकल्प/कामे) ही पदे सरळसेवेने अथवा प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या "टाईम्स ऑफ इंडिया" या वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले. तसेच रेल्वे बोर्ड, नवी दिल्ली यांना पत्र निर्गमित करुन सरळसेवेसाठी अथवा प्रतिनियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या अधिकाऱ्यांचे नामनिर्देशन करण्यास विनंती करण्यात आली. त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरही दिनांक १२.०८.२०१७ रोजी जाहिरात, सेवाप्रवेश नियम इत्यादी माहिती प्रसारीत करुन पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्यास विनंती करण्यात आली होती.

७.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर जाहिरातीच्या अनुषंगाने संचालक (प्रणाली) या पदाकरीता १३ अर्ज/नामनिर्देशन प्राप्त झाले. त्यापैकी सेवाप्रवेश नियमानुसार पात्र झालेल्या ८ उमेदवारांना दिनांक ७ डिसेंबर, २०१७ रोजी मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले. निवड समितीने घेतलेल्या मुलाखतीस अनुसरुन सादर केलेल्या अहवालानुसार सर्वानुमते संचालक (प्रणाली) या पदाकरीता नेमणूकीसाठी श्री.आर.के.शर्मा यांची शिफारस केली असून श्री.जनककुमार गर्ग यांचे नाव प्रतिक्षासूचीवर ठेवण्याची शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे संचालक (प्रकल्प/कामे) या पदाकरीता १५ अर्ज/नामनिर्देशन प्राप्त झाले. त्यापैकी सेवाप्रवेश नियमानुसार पात्र झालेल्या १० उमेदवारांना दिनांक ७ डिसेंबर, २०१७ रोजी मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले. निवड समितीने घेतलेल्या मुलाखतीस अनुसरुन सादर केलेल्या अहवालानुसार सर्वानुमते संचालक (प्रकल्प/कामे) या पदाकरीता नेमणूकीसाठी श्री.डी.राधाकृष्णन रेड्डी यांची शिफारस केली असून श्री.प्रमोद आहुजा यांचे नाव प्रतिक्षासूचीवर ठेवण्याची शिफारस केली आहे. सदर दोन्ही पदांवर निवडलेले अधिकारी प्रतिनियुक्तीवर येण्यास इच्छूक आहेत.

७.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, निवड समितीने सादर केलेल्या अहवालास आणि वर नमूद केल्याप्रमाणे निवड समितीने शिफारस केलेल्या श्री.आर.के.शर्मा व श्री. डी. राधाकृष्णन रेड्डी यांना अनुक्रमे संचालक (प्रणाली) व संचालक (प्रकल्प/कामे) या

पदांकरीता प्रतिनियुक्तीवर नियुक्त करण्याच्या दृष्टीने खालील ठराव मंजूर करावा अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३४३ :-**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७चे उपकलम (३)(i)(५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे निवड समितीच्या अहवालास मान्यता देत आहे आणि त्यानुसार निवड समितीने अहवालास शिफारस केल्याप्रमाणे संचालक (प्रणाली) या पदावर श्री.आर.के.शर्मा आणि संचालक (प्रकल्प/कामे) या पदावर श्री.डी.राधाकृष्णन रेड्डी यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** संचालक (प्रणाली) व संचालक (प्रकल्प/कामे) पदावर प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्याच्या दृष्टीने पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********